॥ या विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

आज़ादी का अमृत महोत्सव

Phone: (02462) 215242 (Ext. - 152)
Fax:(02462) 215572

ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Website: srtmun.ac.in
email: affiliation@srtmun.ac.in

**शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करिताच्या विद्यमान संस्थेतील AICTE नवी दिल्ली या शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमांच्या व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत.**

:: <u>परिपत्रक</u> ::

संदर्भ :– १. मा. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांकः २/एनजीसी/मान्यता/एआयसीटीई/२०२५/९३५, दिनांक : १२, नोव्हेंबर, २०२४.

२. मा. प्र. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र क्रं. विकाछसं/शिक्षण/२०२४/२२४४, दिनांकः ०६, डिसेंबर, २०२४.

३. या विभागाचे परिपत्रक क्र. शैक्षणिक/संलग्न–०३/२०२४–२०२५/१८४ दि. १०/०७/२०२४

उपरोक्त विषयी व संदर्भीय पत्र क्र. १ व ०२ नुसार प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत AICTE नवी दिल्ली या शिखर संस्थेच्या मान्यतेनुसार चालणारे महाविद्यालयाचे अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी अधिसूचना/जाहीर सूचना/परिपत्रका द्वारे शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करीताच्या नवीन संस्था/अभ्यासक्रम इत्यादीच्या मान्यता प्रकिये संदर्भातील अटी, शर्ती, मानके व मान्यता प्रक्रियेचे वेळापत्रक प्रसिध्द केले आहे व त्या संबंधीचे Approval Process Handbook प्रसिध्द केले आहे. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अधिपत्याखाली येणा–या संस्थामधील अभ्यासक्रमांच्या व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार शासनाच्या ना हरकत प्रमाणपत्र/शासन मान्यतेकरिता अर्ज/प्रस्ताव संबंधित विभागीय कार्यालयांकडे सादर करण्यात यावेत.

राज्यातील विद्यमान AICTE शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील प्रस्तावित नवीन संस्था व विद्यमान संस्थापैकी ज्या संस्था संदर्भीय अधिसूचना/जाहीर सूचना/परिपत्रकानुसार AICTE नवी दिल्ली यांचेकडे अर्ज करणार आहेत, अशा संस्थांनी शासनाची मान्यता/शासनाचे ना हरकत प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव दि. २२/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेली नोंदणी शुल्क भरलेल्या पावतीसह तात्काळ संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये

यांचेकडे सादर करावा. तसेच इतर प्रकरणी (उदा. प्रवेशक्षमता वाढ/घट इ.) दिनांक २२/०२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क विभागीय कार्यालयाकडे भरणा करुन प्रस्ताव सादर करावा.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी निर्धारित केलेल्या मानकांप्रमाणे संस्थेकडे पूर्णपणे सद्य:स्थितीत वापरायोग्य सोयीसुविधा असतील तसेच समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेली व सक्षम प्राधिका–यांनी निर्गमित केलेली प्रमाणपत्रे उपलब्ध असतील तरच संस्थांनी आपले प्रस्ताव विभागीय कार्यालयांकडे सादर करावे. तसेच शासनाची मान्यता/शासनाचे ना हरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर करण्यास विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थाची राहील याची नोंद घेण्यात यावी. सुलभ संदर्भासाठी उपरोक्त संदर्भीय पत्र क्रं. १ व २ सोबत जोडण्यात आलेले आहेत.

तसेच आपणास हे ही कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय परिपत्रक क्र. ०३ नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या मा. व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या ठरावानुसार प्रस्तुत विद्यापीठाचे नाहरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

सदर परिपत्रक हे विद्यापीठाच्या www.srtmu.ac.in या संकेतस्थळवार affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात येत आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर,
विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न–०३/२०२४–२०२५/1227
दिनांक :– १६/१२/२०२४.

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :–

१. मा. अध्यक्ष/सचिव, नवीन संस्था व विद्यमान संस्थेतील AICTE नवी दिल्ली या शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील सर्व संलग्नीत व्यावसायीक महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
२. सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर Affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.